# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
# ग्राहक तक्रार निवारण मंच
# कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर यांचे समोर

ग्राहक तक्रार क्र. ९५–२०१०/ दिनांक :

| | |
|---|---|
| श्री. रामू सिद्राया माळी (खलाटी)<br>मु. पो.वज्रवाड , ता. जत, जि. सांगली | अर्जदार |

**विरूध्द**

| | |
|---|---|
| १) कार्यकारी अभियंता (का.) तथा नोडल ऑफीसर,<br>म.रा.वि.वितरण कं.लि.,संवसु मंडळ कार्यालय,<br>मंडल कार्यालय, विश्रामबाग, सांगली<br>२) कार्यकारी अभियंता<br>म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,<br>विभागीय कार्यालय, कवठे महांकाळ, जि. सांगली<br>३) सहाय्यक अभियंता,<br>म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,<br>उप विभागीय कार्यालय, जत, जि. सांगली | विरूध्द पक्षकार |

**कोरम** :– १) श्री. बी.जी. पवार, अध्यक्ष,
२) श्री. जी.बी. पानकर, सदस्य–सचिव
३) श्री. जी.सी. लेले, सदस्य

## महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग

(ग्राहक तक्रार निवारण मंच)

विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

## न्याय निर्णय

श्री. बी.जी. पवार, अध्यक्ष, ग्रा.त.नि.मंच, कोल्हापूर खालील प्रमाणे न्याय निर्णय देत आहेत.

श्री. रामू सिद्राया माळी (खलाटी), मु. पो.वज्रवाड, ता. जत, जि. सांगली यांनी शेतीपंपास विद्युत पुरवठा मिळावा म्हणून दि. २२.१.२००९ रोजी अर्ज केला. त्यांना कृती मानकानुसार ३० दिवसांचे आंत चलन मिळाले नाही. दि. २९.३.२०१० रोजी अंतर्गत ग्राहक तक्रार निवारण कक्ष, सांगली येथे तक्रार दाखल केली आहे. अंतर्गत कक्षाचे आदेश दि. १.४.२०१० रोजी पारित झाले आहेत.

प्रस्तुतची तक्रार मंचाकडे दि. १६.४.२०१० रोजी दाखल केल्याचे दिसते. नुकसान भरपाई मिळावी अशी मागणी केली आहे. वितरण कंपनीला नोटीस देवूनही दि. ६.५.२०१० पर्यंत लेखी अहवाल दिला नाही.

प्रस्तुतच्या प्रकरणाची सुनावणी मंचासमोर दि. १७.५.२०१० ला ठेवली असतां, वि.प.ने आपला लेखी अहवाल मंचासमोर हजर केला. तक्रारदाराचे प्रतिनिधी श्री. खापरे हजर. वि.प.तर्फे श्री. कुलकर्णी, कनिष्ठ अभियंता, कवठे महंकाळ विभाग व श्री. राजमाने, कनिष्ठ अभियंता, जत उप विभाग उपस्थित. तक्रारदाराचा अर्ज दि. २२.१.२००९ ला मिळाल्याचे मान्य केले आहे व त्यांस दि. ५.५.२०१० रोजी चलन देण्यात आले आहे. तक्रारदाराने चलन भरलेले नाही, टेस्ट रिपोर्ट दिलेला नाही. चलन भरलेनंतर व चाचणी अहवाल दिलेनंतर नियमाप्रमाणे कनेक्शन देण्यात येईल असे म्हटले आहे. तक्रारदाराने प्रतिनिधीमार्फत मंचासमोर अर्ज दाखल केला त्यात दि. ५.५.२०१० रोजी चलन मिळाले आहे व वि.प.तर्फे तात्काळ विद्युत पुरवठा करण्याची हमी दिली असल्याने तक्रारीचे निराकरण झाले आहे, तक्रार मागे घेत आहे, भरपाईची मागणी मागे घेत आहे असे म्हटले आहे. तक्रारदाराने तक्रार मागे घेतली असल्याने निकाली काढणेत येत आहे. खालील प्रमाणे आदेश –

## आदेश

१) तक्रार निकाली काढणेत येत आहे.

२) खर्चाबाबत आदेश नाही.

३) या निर्णयाविरूध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा, बांद्रा–कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई–५१ यांजकडे करता येईल.

दिनांक : ( बी. जी. पवार )
अध्यक्ष

श्री. जी. बी. पानकर, सदस्य सचिव :

श्री. जी. सी. लेले, ग्राहक सदस्य :